महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा)- सत्र-108
अंतीम परिक्षा

पेपर क्र.V — गुरुवार - 22/08/2013

विषय - फॉरेन्सिक सायन्स, सायबर फॉरेन्सिक्स आणि फॉरेन्सिक मेडिसीन — वेळ - 10.30 ते 13.30

Forensic Science, Cyber Forensics & Forensic Medicine — गुण - 100

*******************************************************************

सुचना- अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. -- All questions are compulsory.

ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहेत. -- Marks for each question are indicated there- against.

क. वाचनीय अक्षरात लिहावे. शब्द-मर्यादा पाळावी. -- Write legibly. Abide by word limit.

ड. फक्त निळया/काळया बॉलपेनचाच वापर करावा. -- Use blue/black ball point pen only.

इ. अ / ब भागांसाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका वापराव्या. -- **Use separate answer-books for part A & part B.**

*******************************************************************

**भाग-अ** **(फॉरेन्सीक सायन्स, सायबर फॉरेन्सीक)** — गुण / Marks

**प्र.क्र. 1** **टिपा लिहा (प्रत्येकी 05 गुण - प्रत्येकी 60 शब्द)** ( 20 )

(1अ) रिकड मार्कस

(1ब) केसांच्या न्यायसहायक प्रयोगशाळेतील तपासणीतून पुराव्याच्या दृष्टीने काय माहिती मिळू शकेल.

(1क) सिमेंट / आर.सी.सी. मधील भेसळ, निम्नदर्जा बाबत पुरावा मिळविण्याकरिता डेबरी (राडारोडा, ढासळलेले इमारतीचा भाग ) गोळा करण्याची पध्दत.

(1ड) ब्रेन मॅपिंग टेस्ट.

**प्र.क्र. 2** **खालील प्रश्नांची जास्तीत जास्त 60 शब्दांमध्ये उत्तरे लिहा.** (प्रत्येकी 05 गुण) ( 10 )

2 अ) बनावट चलनी नोटा ओळखण्याच्या पध्दती लिहा.

2 ब) बनावट चलनी नोटा बनविणाऱ्या कारखान्यामधुन कोणत्या वस्तु जप्त करणे आवश्यक आहे?

**प्र.क्र. 3** **खालील प्रश्नांची जास्तीत जास्त 60 शब्दांमध्ये उत्तरे लिहा.** (प्रत्येकी 05 गुण) ( 10 )

3 अ) चोरी गेलेल्या मोबाईल हस्तगत करणे करीता तपासी अंमलदाराने कोणते उपाय करावेत?

3 ब) गुन्हयात वापरलेला संगणक जप्त करण्याची प्रक्रिया (Procedure) विषद करा.

**प्र.क्र. 4** **खालील परिच्छेदाच्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा** ( 10 )

दिनांक 5/8/2013 रोजी मोहन, वय 28 वर्षे, धंदा सॉफ्टवेअर इंजिनिअर याने पंचवटी पोलीस स्टेशनला येवुन खालील प्रमाणे फिर्याद दिली.

दिनांक 1/7/2013 रोजी रात्री 8 वा. मला एक email आला. सदरच्या email मध्ये खालील मजकूर होता :-

*माझे नाव डायना आहे. मी 'क्युबा' या देशाची रहिवाशी आहे. मी 21 वर्षाची सुंदर तरुणी आहे. मी एका अनाथाश्रमात राहते. माझे वडील क्युबा देशातील श्रीमंत व्यक्तींपैकी एक होते. माझे पुर्ण परिवाराला क्युबा मधील माफियांनी 8 वर्षापुर्वी मारुन टाकले आहे. मी माझ्या परिवराच्या संपुर्ण संपत्तीची एकटी कायदेशीर वारस आहे.*

*मी तुमचे 'फेसबुक अकाउंट' पाहिले. त्यातील तुमचा बायोडेटा व स्वभाव खुप आवडला. मला भारतात येवुन तुम्हाला प्रत्यक्ष भेटण्याची इच्छा आहे. मला माझे उर्वरित जीवन भारतात व्यतीत करावयाचे आहे. मला भारतात येण्यापुर्वी माझी सर्व संपत्ती देखील भारतात ट्रान्सफर करावयाची असल्याने मला भारतातील एक बँक खात्याची*



11

*आवश्यकता आहे. तरी मला पुढील माहिती कृपया पाठवा. (1) तुमचे संपुर्ण नाव व पत्ता (2) तुमच्या शाळा व कॉलेजचे नाव व पत्ता (3) काम करण्याचे ठिकाण व पत्ता (4) कुटूंबातील सदस्य व प्रिय व्यक्तींची (आई, वडील, भाऊ व बहिण) नावे (5) तुमची जन्म तारीख (6) तुमच्या बँकेचे नाव, खाते क्रमांक, बँक शाखेचे नाव, पत्ता (7) बँकेचा IFSC कोड आणि (8) तुमचा मोबाईल नंबर*

आपली प्रिय,

डायना

वरील email ला तात्काळ प्रतिसाद देऊन माझी संपुर्ण माहिती email व्दारे पाठविली. दिनांक 4/8/13 रोजी मी पैसे काढण्यासाठी बँकेचे ATM वर गेलो असता माझे अकाऊंटवर शुन्य बॅलंस आढळुन आले. माझे खात्यात पुर्वी रुपये 90,000/- होते व माझे पैस गेलेले आहेत. तरी वरील व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही करुन मला न्याय मिळवुन द्यावा व पैसे परत मिळवून द्यावेत.

| | | | |
|---|---|---|---|
| **प्र.4 (अ)** | **तुम्ही तपासी अंमलदार या नात्याने कोणत्या पाच महत्वाच्या बाबी कराल, ते क्रमवार नमूद करा.** | **(80 शब्द)** | [05] |
| **प्र.4 (ब)** | **ई-मेल आयडीचा मागोवा (Tracking) घेण्याच्या पध्दती विषद करा.** | **(80 शब्द)** | [05] |

**भाग-ब** **(फॉरेन्सीक मेडीसीन)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्र.क्र. 1 | आत्मघाती (Suicidal) व अन्यघाती (Homicidal) गळफास यातील फरक लिहा. | | **(100 शब्द )** | ( 10 ) |
| प्र.क्र.2 | बलात्कारीत स्त्रीच्या न्यायवैद्यकिय तपासणी बाबत टिप लिहा. | | **(100 शब्द)** | ( 10 ) |
| प्र.क्र.3 | खालील संज्ञाचे विश्लेषण करा. | | | (05) |
| 3 (अ) | खरचटलेल्या जखमा (Abrasion wounds) | 2.5 गुण | **(40 शब्द)** | |
| 3 (ब) | फाटलेली जखम (Lacerated wounds) | 2.5 गुण | **(40 शब्द)** | |
| प्र.क्र.4 | अग्नीशस्त्राचे गोळीच्या प्रवेशाची जखम व गोळी बाहेर पडल्याची जखम यातील फरक स्पष्ट करा. | | **(100 शब्द)** | ( 10 ) |
| प्र.क्र.5 | मरणोत्तर तपासणीत विषबाधा झाल्याचे कसे ठरवले जाते? | | **(100 शब्द)** | ( 10 ) |
| प्र.क्र.6 | खालील संज्ञावर संक्षिप्त टिपा (01 गुण आणि प्रत्येकी 30 शब्द) लिहा. | | | ( 05 ) |

**(i)** मरणोत्तर निलिमा    **(ii)** क्युटिस अन्सेरिना

**(iii)** मलमुत्र निस्सारण    **(iv)** मरणोत्तर ताठरता

**(v)** गळफासाच्या खुणा

***************************************************************************



12